## प्रकरण सहावे

## वृध्द शेतक-यांच्यासाठी वृध्दाश्रम योजना

### योजनेचे गरज :-

बदलत्या समाजाच्या गरजा बदलत असतात बदललेल्या गरजा पूर्ण करण्यासाठी नवीन सामाजिक संस्था निर्माण होत असतात वृध्दाश्रम ही अशीच बदलत्या समाजाच्या गरजेतून निर्माण झालेली संस्था आहे. औद्योगिक क्रांती नंतरच्या काळात समाजाचे स्वरुप झपाटयाने बदलत चालले कुटूंबासारखी समाजातील केंद्रीयभूत संस्था ही बदलाच्या या प्रवाहास आलिप्त राहू शकली नाही एकत्रीत कुटूंब पध्दती मागे पडू लागली. विभक्त कुटूंब पध्दती रुढ होवू लागली सभासदांच्या सर्व प्रकारच्या जबाबद-या स्वीकारण्याची किंवा सर्व प्रकारच्या सभासदांच्या जबाबदा-या स्वीकारण्याची कुटूंब संस्थेची शक्ती कमी होवू लागली अपंग परावलंबी वृध्द इतकेच नव्हे तर अजान बालकांच्याही जबाबदा-या स्वीकारल्याचे आपले परंपरागत कर्तव्य नव्या समाजातील नवी कुटूंब संस्था पार पाडायला असमर्थ ठरु लागली त्यामुळे औद्योगिक क्रांतीचे अपत्य म्हणून आकाराला येत असलेल्या शहरी समाजा मध्ये शिशुगृहे पाळणा गृहे अपंग संगोपन गृहे निर्माण होवू लागली वृध्दाश्रम ही याच मालीकेतील संस्था आहे.

समाजातील बदल हळूहळू सर्वस्तरात पाझरत असतात नागरी समाजात घडून येणारे बदल नागरी समाजात थोड्या वेळाने का असेना घडून येतच

आहेत शहरी कुटूंबा प्रमाणे ग्रामीण समाजातील कुटूंब संस्था देखील आता बदलू लागली असल्याचे अभ्यास क्षेत्रात वावरत असतांना दिसून आले. पूर्वी प्रमाणे वृध्द सभासदांना सन्मानाचे जीवन आता ग्रामीण कुटूंबातूनही दुर्मीळ होत असल्याचे जाणवते. वृध्दांच्या या अवस्थेचे चित्रण या पूर्वी इतर प्रकरणातून सविस्तर आलेले आहे. या अवस्थेतील वृध्दांच्यासाठी कांही पर्यायी मार्ग उपलब्ध होणे ही ग्रामीण वृध्दांची आता गरज ठरत आहे. ज्या ग्रामीण वृध्द शेतक-यांच्या समोर वृध्दाश्रमाची आम्ही कल्पना मांडली त्या पैकी सर्व वृध्दांनी ती उचलून धरली त्यांनी अशा प्रकारच्या वृध्दाश्रमाची गरज असल्याचे मान्य केले

" तुम्ही वृध्दाश्रमात राहायला जाल का ? "

या प्रश्नाचे उत्तर " घरी समाधानाने व सन्मानाने राहाता येत नसल्याने आम्ही जावू " असे ७८ टक्के वृध्द शेतक-यानी दिले ज्या २२ टक्के शेतक-यांनी वृध्दाश्रमात आपण जाणार नांही असे सांगीतले. त्यांनीही " गावात वृध्दाश्रम असावा " हे मान्य केले इतकेच नव्हे तर आपण राहायला गेलो नांही तरी विरंगुळा म्हणून वृध्दाश्रमातील समवयस्का मध्ये सतत वेळ घालवू असे सांगीतले. जे २२ टक्के लोक वृध्दाश्रमात राहायला राजी नांहीत ते साधारणत: सुख वस्तू व बागायतदार जमीनदारात मोडणारे असल्याचे आढळून आले मात्र इतरांची असहाय्य अवस्था पहाता असल्या मुळे गरजू वृध्दांच्यासाठी अशी संस्था आपल्या गावात असलीच पाहिजे यावर सर्वांनी भर दिला.

योजनेचे स्वरुप :-

[१] आश्रमाचे ठिकाण :-

गावाच्या मध्यवर्ती ठिकाणी किंवा गावा लगत मोकळ्या हवेत किंवा गावातील मंदीराच्या जवळपास एकादी इमारत वृध्दाश्रमासाठी असावी जीवनावश्यक सुविधा बाथरुम संडास वगैरेनी सोयीच्या अशा दोन खोल्यांचा ब्लाक प्रत्येकाला असावा चाळ वजा स्वरुपात बांधल्या जाणाऱ्या इमारती मध्ये २५ ते ५० पर्यंत वृध्द जोडप्यांना किंवा वृध्दांना राहता येईल इतकी इमारत असावी भारतीय लोक संख्येत ६.६ टक्के आहे. याचा अर्थ १००० लोक वसतीच्या गावात ६६ वृध्द माणसे असतात ६६ पैकी कांही वृध्दाश्रमात जायला तयार नसतात संशोधकाच्या मुलाखती २२ टक्के राहीला जायला नांही म्हणतात याचा अर्थ १६ वृध्द घरी राहणार म्हणजे ५० च्या दरम्यांन वृध्दाश्रमात जाणार म्हणून ५० वृध्दांची किंवा २५ जोडप्यांची व्यवस्था करण्यासाठी २५ खोल्या पाहिजेत इमारत साधीच पण मजबूत आणि हवेशीर असावी अशा सूचना या संदर्भात वृध्द शेतकऱ्यांच्याकडून संशोधकाकडे आल्या

[२] संपत्तीक व सर्व जातीय धर्मीयांनी एकत्र रहावे :

बहुतेक वृध्द शेतक-यांनी किंवा शेतकरी स्त्रीयांनी पती पत्नी दोघे मिळून राहायला जायाचे मान्य केले शेवट पर्यंत परस्परांना साथसोबत देण्याची भावना शेतक-यांनी बोलून दाखविली " वृध्द आश्रमातील कसे असावेत ? "

या प्रश्नाला दिलेल्या उत्तरातून ही ग्रामीण शेतक-यांनी कांही सूचना केल्या " आश्रमात सर्व जाती धर्मांच्या लोकांनी आपल्या खोलीत पण एकाच आश्रमात राहायला हरकत नांही " असे कांही जनानी सांगीतले तर " आश्रमा मध्ये रोज देवाचे भजन कीर्तन चालावे म्हणजे परमेश्वर चिंतनात आपला वेळ जाईल असेही ब-याच जनांनी सुचविले.

[३] आश्रमातील कार्याची स्वरूप

" आश्रम मध्ये हलकी कामे करायला काय? " या प्रश्नांला सर्वांनी होकार दिला शेतीशी संबंधात व बसून करता येणारी किंवा हलक्या स्वरूपाची कामे करण्याची तयारी सर्वांनी दाखविली अंबाडी पासून तयार केलेल्या वाखात पासून दोरखंड किंवा शेतीसाठी लागणा-या वस्तू तयार करण्याची तयारी कांही जनानी दाखविली तर कांही जनांनी हातपाय चाले पर्यंत गुरे पाळण्याचे काम मान्य केले

कांही वृध्दांनी लोकरी पासून सूत व त्या पसतून घोंगडी बनविण्यचा परंपरागत व्यवसाय आश्रमातील वृध्द करू शकतील असे सुचविले कांही जनानी कापासा पासून सूत चरख्यावर तयार करण्याची तयारी दाखविली तर कांही जनांनी शेतीची राखण करण्याचे काम दिवसभर करता येईल असे सुचविले स्वतः:च्या कुटूंबासाठी किंवा इतरांच्या साठी अशी कीरकोळ कामे करून आश्रमासाठी पैसा मिळविण्याची मानसिक हिंमतही कांही जनानी बोलून दाखविली " फुकट खान्या पेक्षा आम्हाला कांही किरकोळ कामे द्या " असे वृध्द म्हणतात याचाच अर्थ त्यांच्या अनुभवाचा व कौशल्याचा यथ्दतशीर वापर करून घेतला तर कांही कामे होतीलच पण त्या बरोबर आश्रम संस्थेच्या उत्पन्नाला ही हातभार लागेल

[४] आश्रमचा खर्च :-

या संदर्भात सर्वात महत्वाचा म्हणून प्रश्न चर्चेला गेला तो आश्रमाच्या खर्चाचे स्वरूप काय? आणि तो खर्च कोणी करायचा ? कसा करायचा ? या संदर्भात ही कांही बोतक-यांनी मार्ग सुचविले आश्रमासाठी जी इमारत बांधावी लागले त्या साठी एकदाच खर्च करावा लागेल आणि तो शासनाचे करावा अशी सर्वांची सूचना होती समाज कल्याण खात्या मार्फत प्रत्येक गांवी एक कायम स्वरूपाची

आश्रम इमारत बांधून देणे शासनाला अशक्य नांही.

दैनंदीनी खर्चा पैकी कांही खर्च शासनाने करावा तर कांही खर्च त्या व्यक्तींच्या कुटूंबाने करावा असा विचार बहुसंख्य शेतक-यांनी बोलून दाखविला कुटूंबानी सोसायच्या खर्चाचा भाग धान्याचा स्वरूपात वसूल केला जावा म्हणजे सोपे होईल अशी महत्वाची सूचना ही कांही शेतक-यांनी केली अजूनही गावाच्या कांही सामुदाईक समारंभासाठी धान्याच्या रूपात पट्टी जमविली जाते तशी सर्व गावातून धान्याच्या रूपाने वर्गणी जमविली जावी अशी आणखी एक महत्वाची सूचना कांही जनानी केली याचाच अर्थ आश्रमाला लागणारे सर्व धान्य गांवाने वर्गणी घालून गोळा करावे ही सूचना व्यवहारी आहे. गावाला ५-५० माणसांना लागणारे धान्य गोळा करून देणे अजिबात अशक्य नसते प्रत्येकाला वृध्दाश्रमाला जाण्याचा प्रसंग येण्याची शक्यता गृहित असल्याने कोणीही या गोष्टीला विरोध करणार नांही तसेच सर्वांच्यासाठी सर्व अशी भावना असल्याने धान्य गोळा करण्या मध्ये कोणाला मान अपमान वाटण्याचेही कांही कारण नांही

आश्रमात लागणा-या धान्याचा प्रश्न सुटल्या नंतर राहतो तो दैनंदीन खर्चाचा प्रश्न या मध्ये औषध दवा पाण्याचा खर्च शासनाने स्वीकारला वृध्दांना मोफत वैद्यकीय

सुविधा देण्याची तयारी दाखविली तर इतर किरकोळ खर्च त्या वृध्द व्यक्तींच्या कुटुंबावरही बसवता येईल तो फारसा जास्त नसल्याने थोडा जमीन जुमला असणा-या घरातील मुले आपल्या आई वडीलांच्यासाठी करू शकतील अगदीच भूमीहीन व शेतमजूर वृध्दांच्या बाबतीत निर्माण होणारा प्रश्नही सर्वांच्या ताकतीने सुटू शकेल.

आश्रमासाठी एखादे स्वयपाकी जोडपे कायमचे नोकरी वर ठेवावे लागेल त्याचा खर्च अर्थात शासनाने किंवा ग्राम पंचायतीने स्वत:च्या फंडातून सोसावा शासन करणार असेल तर प्रश्नच नाही ग्रामपंचायत करणार असेल तर कर रूपाने किंवा शासनाकडून मिळणा-या अनुदान स्वरूपाने ही रक्कम उभी राहू शकेल या आश्रमाची व्यवस्थापन गावच्या ग्रामपंचायतीने व शासनाच्या खास कायदेशीर तरतुदीने चालावे असे अनुभावी व पोक्त शेतकरी वृध्दांनी संशोधकाला अवर्जून सांगीतले. शासनाचीच एक अंगीकृत संस्था असल्यामुळे तिचे सातत्य टिकून राहील शिस्त निर्माण होईल असे या वृध्दांना वाटते.

# प्रकरण सातवे

## वृध्द शेतकऱ्यांच्यासाठी निवृत्ती वेतन योजना

### योजनेची गरज :-

सरकारी निमसरकारी संस्थांच्या मधून नोकरी करणाऱ्या सर्व लोकांना आता पेन्शन योजने मध्ये सहभागी करुन घेण्यात आल्याचे आढळते कांही सहकारी संस्थाही आपल्या नोकरांच्यासाठी निवृत्ती वेतन योजना सुरु करीत आहे. खाजगी कारखानदारही आपला नोकर किंवा कामगार निवृत्त झाल्या नंतर त्याचे उरलेले आयुष्य परावलंबी ठरु नये त्याच्या किमान जीवनावश्यक गरजा वृध्दापकाळी भागविल्या जाण्यात इतकी रक्कम त्याला देण्याची तरतूद सुरुवाती पासूनच करीत असतात. शेतकरी किंवा शेती क्षेत्रातील श्रमिकच फक्त अशा कोणत्याच सुविधा मिळवू शकत नांहीत. शेती हा खासगी व्यवसाय मानलेला आहे. जमीनीची मालकी खाजगी असते तशा अर्थाने हा खाजगी व्यवसाय ठरत असला तरी त्यांच्या फायद्या तोट्याचा मात्र विचार केला जात नांही. तोट्यात चालणारे कारखाने मालक बंद करतो. शेतकरी ते करु शकत नांही मालक बंद पडलेल्या कारखान्यातील कामगारांची सर्व जबाबदारी प्रसंगी शासन सोसते. शेती क्षेत्रातील श्रमिक शेतमजूरांची जबाबदारी मात्र कोणी घ्यायला तयार नसते. तोट्यात चालणारे कांही शासकीय प्रकल्प किंवा महामंडळे या मध्ये काम करणारे कर्मचारी देखील पेन्शन

ग्रॅच्यूटी प्रॉव्हिडंड फंड याचा कायदेशीर लाभ घेतल्याविना सोडत नांहीत शेती क्षेत्रातील श्रमिक समाज मात्र ते कांहीच मिळवू शकत नांहीत. त्यांनी ते मागायचे नसते किंवा त्यांना ते द्यायचेच नसते असा सर्वांचा सोयीस्कर समज दिसतो म्हणूनच इतरांच्या प्रमाणे शेतकरी शेत मजूरासाठी पेन्शन मिळाली पाहिजे असे म्हणताच अनेकांना आश्चर्याचा धक्का बसल्याचे संशोधन काळात जाणवले " हे कसे शक्य आहे? " असा प्रश्न बहुतेकजनांनी विचारला स्पष्टीकरण केल्या नंतर मात्र प्रत्येकांनी या विचाराला संमती दर्शविली संशोधन काळात झालेल्या अनेक व्यक्तींच्या गाटीभेटी व चर्चा चिंतनातून शेतक-यांच्यासाठी जी निवृत्ती वेतन योजना मांडणे शक्य झाले ते तिचे थोडक्यात स्वरूप असे

<u>योजनेचे स्वरूप</u> :-

ज्या १०० शेतक-यांना निवृत्ती वेतनाच्या योजने संदर्भात प्रश्न विचारले त्या सर्वांनी योजना समजावून सांगीतले नंतर व ती राबविणे अशक्य नांही हे पटल्या नंतर या योजनेला मान्यता दिली इतकेच नव्हे तर वास्तव परिस्थितीला अनुसरून कांही मौलिक सूचना ही केल्या " निवृत्ती वेतनाची रक्कम किती असावी ? "

या प्रश्नाला ८ टक्के शेतक-यांनी ३०० रूपये महिना सांगीतले तर ३० टक्के शेतक-यांनी २०० रूपये सांगीतले ६० टक्के नी १०० रूपये महिन्या मध्ये खेडे गावात एका व्यक्तीचे जीवन मान उत्तम चालते असे ही सांगीतले x घर भाडे द्यावे लागत नांही धान्य फारसे विकत आणावे लागत नांही इतर वस्तूही शहरा पेक्षा स्वस्त मिळतात त्यामुळे १०० रूपया मध्ये सुध्दा भागू शकते या निष्कर्षा प्रत संशोधकाला येण्या मध्ये अडचण दिसत नांही.

टिप: प्रकरणाच्या शेवटी आलेख पहावा

... UNIVERSITY

भारतीय लोक संख्येची वयोरचना [ वयोगट वर्षात ]

| वर्ष | ० ते १४ | १५ ते ५९ | ६० किंवा अधिक |
|---|---|---|---|
| १९५१ | ३७.४ | ५७.१ | ५.५ |
| १९६१ | ४१.० | ५३.३ | ५.७ |
| १९७१ | ४१.४ | ५३.४ | ५.२ |
| १९८१ | ३९.५ | ५३.९ | ६.६ |

१०० रुपये महिन्याला या प्रमाणे किती लोकांना पेन्शन द्यावे लागेल ? हा प्रश्न या ठिकाणी महत्वाचा आहे. भारतीय समाजात विशेषत: ग्रामीण समाजात ६० वर्षाच्या वयावरील वृध्दांचे प्रमाण एकूण लोकसंख्येच्या ६.६ टक्के असते ८० कोटी एकूण लोक संख्येच्या ७० टक्के शेती व्यावसायीक मानले तर ते ५६ कोटी होतात. ५६ कोटीच्या ६.६ टक्के वृध्द मानले तर ३.३ कोटी होतात. ३ कोटी ३० लाख लोकांना महिन्याला १०० रुपये याचा अर्थ ३३० कोटी रुपये महिन्याला याचाच अर्थ ३९६० कोटी रुपये वर्षाला सरकारी खजिन्यावर बोजा पडेल.

चार हजार कोटीच्या दरम्यान पडणारा हा बोजा पेलन्यासाठी शासकीय तिजोरीत पैसा आणण्याचे कांही मार्ग शेतकऱ्यांनीच संशोधकला सुचविले. रोजगार हमी योजना कर जसा महाराष्ट्र शासनाने प्रत्येक व्यावसायीकावर बसविलेला आहे तसा भारतातील सर्व लोकांना वर्षाला फक्त

---

संदर्भ :- फॅक्ट बुक ऑन मॅन पॉवर पृष्ठ १२/स्टॅटीस्टीकल आउट लाईन ऑफ इंडिया १९८४ पृष्ट ३८

१० रुपये पेन्शन टॅक्स बसविला तरी ८०० कोटी रुपये जमतात बागायत शेतक-यावर जशी संपूर्ण पट्टी एकरी बसविली जाते तशी सर्व पिका खालच्या संपूर्ण क्षेत्रावर एकरी फक्त १० रुपये वर्षाला पेन्शन टॅक्स बसविला तरी आज पिकाखाली उपलब्ध असलेल्या जमीनीचे क्षेत्र लक्षात घेता त्यातून उरलेली रक्कम सहज उभारली जाईल किंवा उरलेला पैसा शेत मालावर प्रक्रीया करणारी जी कारखानदारी आहे त्यांच्यावर टॅक्सच्या रुपाने बसवून उभा करता येईल कारण या कारखान्यांना लागणारा कच्चा माल ज्या शेतक-यांचा श्रमातून निर्माण झालेला असतो त्यांच्यासाठी या कारखानदारांनी ती जबाबदारी स्वीकारण्या मध्ये कांहीही गैर नांही. नांही तरी ती वसुली त्या वस्तूच्या किंमती तेवढ्या प्रमाणात वाढवून शेवटी ते ग्राहकाच्याकडूनच करणार आहेत या विविध कर रुपाने हा पैसा जमा करणे शासनाला अवघड किंवा अशक्य नांही संजय निराधार योजनेवर महाराष्ट्र सरकार दर वर्षी प्रचंड रक्कम खर्च करते रोजगारांची हमी मिळावी म्हणून दरवर्षी प्रचंड खर्च होतो तर ज्या वृध्दांच्या आयुष्यभराच्या श्रमातून सर्वांच्या चुली पेटलेल्या असतात त्या वृध्द शेतक-यांना वृध्दात काळातील सेवा सुश्रुतेची हमी मिळावी म्हणून सर्व समाजाने म्हणजेच शासनाने प्रत्यक्ष अप्रत्यक्ष रित्या थोडी झीज सोसण्याची तयारी दाखवावी यात गैर कांही नांही.

<u>योजनेची अयुक्तता :-</u>

ग्रामीण वृध्दांना जर पेन्शनची हमी मिळाली तर त्यांचे उर्वरीत

जीवनसुखाचे व समाधानाचे जाईल आपल्याला वृध्दाप काळी जरी आपल्या मुलांनी पाहिले नांही तरी आपला समाज म्हणजेच आपले शासन आपली जबाबदारी घेणार याची शाश्वती मिळाल्या मुळे शेतकरी तरूण आयुष्यभर आपल्या शेतात मनापासून राबेल जास्तीत जास्त उत्पादन काढेल शासनाच्या सगळ्या योजनांना चांगला प्रतिसाद देईल शासनाने उत्पादनाचे ठरवून दिलेले इष्टांक पूर्ण करण्याची ईर्षा त्यांच्या मध्ये निर्माण होईल शेतकरी समाज मनाचा कानोसा घेत असतांना " आपला वाली कोणी नांही " अशी खंत अभ्यासका सामोर व्यक्त होताना आढळली म्हातारपणी आपले कसे होणार ? ही धास्ती शेतकऱ्यांनि जीवनभर घेतलेले असते त्यामुळे त्यांच्या निराशेचा त्यांच्या उत्पादकतेवर निश्चितच दुष्परिणाम झालेला असतो. राष्ट्राचा हा अप्रत्यक्ष होणारा तोटा आपल्या लक्षात येत नांही ज्या नोकरांना किंवा श्रमिकांना सर्व दृष्टीने शाश्वती मिळते त्यांची कार्यशक्ती वाढलेली आढळून येते शेतकरी समाजाला पेन्शनची शाश्वती देवून त्यांची उत्पादकता वाढविणे राष्ट्राच्या अंतिम फायद्याचे ठरणार आहे.

समाजवादी समाजरचनेचे कंकण आपण बांधलेले आहे. समाजातील सर्वांना समान न्याय देणे हे आपले राष्ट्रीय ब्रीद आहे. मग इतर श्रमिकांना मिळणारी पेन्शन सवलत शेतकऱ्यांना देण्या मध्ये कांहीही गैर नांही उलट इतर वध्द सेवा निवृत्त झाल्या नंतर त्या क्षेत्राशी त्यांना कांहीही संबंध उरत नांही ते मिळालेला सर्व मोकळा वेळ वाचन गप्पा मारण्यात किंवा समवयस्का बरोबर पत्ते पिसत बसण्यात घालवतात

शेतकरी वृध्द झाला तरी शेतीचो संबंध सोडत नांही मुलाने टाकून बोलले किंवा सुनेने झिडकारले तरी शेतात जपवून आश्रू गाळीत का असेना जमेल ते काम करण्यात स्वत:चे मन रमवतो गुरे राखण करतो तीच कामे तो समाधानाने करून जर पेन्शान मुळे स्वाभीमानाने वावरू लागला तर त्याचा फायदा अप्रत्यक्ष त्याच्या कुटूंबाला आणि समाजाला निश्चित पणे होईल असे संशोधकाचे अभ्यास अंती मत बणलेले आहे.




SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

